

# प्रकरण पहिले

# संकल्पना





# - प्रकरण पहिले -

## संकल्पना

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १.१ | प्रस्तावना | ११ |
| १.२ | चित्रपट माध्यमाची वैशिष्ट्ये | १२ |
| १.३ | मराठी चित्रपटाचे बदलते स्वरुप | १७ |
| १.४ | मराठी चित्रपट निर्मिती प्रक्रिया | २१ |
| १.५ | प्रमुख समस्यांची ओळख | २७ |
| १.६ | अभ्यासाचे महत्त्व | २९ |
| १.७ | भावी दिशा | ३२ |
| १.८ | नवे प्रवाह | ३३ |
| १.९ | समारोप | ३३ |
| | संदर्भसूची | ३४ |

# - प्रकरण पहिले -

## संकल्पना

### १.१ प्रस्तावना

आधुनिक काळात चित्रपट हे एक प्रभावी माध्यम बनलेले आहे. नवीन सहस्रकात इ.स. २००० पासून चित्रपटाचे स्वरुप झपाट्याने बदलत चालले आहे. आजच्या या जागतिकीकरणाच्या लाटेत इंग्रजी चित्रपटांप्रमाणेच भारतीय भाषेतील चित्रपटही बदलत आहेत. हिंदी भाषेतील चित्रपटांप्रमाणेच मराठी भाषेतील चित्रपटांच्या निर्मितीमध्येही अनेक नवे नवे प्रयोग केले जात आहेत. तथापी मराठी चित्रपटांची निर्मिती ही तेलगू आणि तामिळ भाषांतील चित्रपटांच्या तुलनेत अधिक अडचणीग्रस्त झाल्याचे दिसून येते. यामुळेच मराठी चित्रपटांच्या निर्मितीमधील समस्यांचा शोध घेणे व त्यावरील उपाय सूचित करणे हा या संशोधनाचा हेतू आहे.

मराठी चित्रपटात झालेल्या बदलांचा आढावा अनेकांनी घेतला आहे. 'बखर सिनेमाची' या पुस्तकात वसंत साठे यांनी म्हटले आहे,

**''फेब्रुवारी ९२ मध्ये मराठी बोलपटांना साठ वर्षे पूर्ण झाली. साठ वर्षांतील मराठी चित्रांनी अनेक वळणे घेतली; पण कौटुंबिक, विनोदी, ग्रामीण या तीन प्रकारच्या कथानकांनीच मराठी सिनेमांवर प्रभुत्व गाजविले.'' ...१**

तथापी मराठी चित्रपटांमधून कथानक, सादरीकरण आणि निर्मितीतंत्र या तीनही क्षेत्रात नवीन सहस्रकात लक्षात येण्याजोगे बदल झाले आहेत. या बदलांचा अभ्यास या लघु शोध प्रबंधात करावयाचा आहे.

माधव शेवाळे यांनी या संदर्भात अत्यंत मौलिक विवेचन केले आहे,

**''चित्रपट हे कलात्मकता आणि तंत्रज्ञान यांचा संगम असलेले माध्यम असून लोकरंजन व लोकशिक्षणाचं प्रभावी माध्यम आहे. चित्रसंवाद व अभिनयाच्या सहाय्यानं कथानक सांगणं ही जशी दृश्यकला आहे तशी श्राव्यकलाही आहे. मनोरंजन, उद्‌बोधन, स्वप्नरंजन, प्रचार, आत्माविष्कार, जीवनभाष्य इ. हेतू या चित्रपट माध्यमाच्या द्वारे प्रभावीपणे मांडता येतात व पाहता येतात.'' ...२**

चित्रपटाच्या निर्मितीप्रमाणेच उद्दीष्ट्य व हेतूमध्येही अनेक महत्त्वाचे बदल झाले आहेत. या हेतूंचे साफल्य किती? प्रबोधनमूल्य श्रेष्ठ की मनोरंजनमूल्य श्रेष्ठ? हे निरंतर चर्चेचे विषय आहेत पण चित्रपटांसारख्या भांडवलप्रधान व्यवसायात खरी समस्या आहे निर्मितीची. त्यातही प्रादेशिक भाषेतील चित्रपट निर्मिती व त्यानंतर वितरण ही तर एक डोकेदुखीच बनली आहे.

या लघु शोधप्रबंधात मराठी चित्रपटांच्या निर्मिती प्रक्रियेत येणाऱ्या समस्यांचा विचार करावयाचा आहे. कारण इंग्रजी व हिंदी या चित्रपटांपेक्षा प्रादेशिक चित्रपट निर्मिती आणि त्यातही मराठी भाषिक चित्रपट निर्मितीतील समस्या जटील स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे अशा समस्यांचा शोध येथे घ्यावयाचा आहे.

## १.२ चित्रपट माध्यमाची वैशिष्ट्ये

चित्रपट माध्यमांची अनेक वैशिष्ट्ये अनेक विचारवंतांनी विविध प्रकारे वर्णन केली आहेत. चित्रपट म्हणजे पडद्यावर चितारलेले काव्य आहे असे म्हणतात. कमीतकमी शब्दात जास्तीतजास्त आशय सांगणे हे काव्याचे वैशिष्ट्य आहे. चित्रपटात देखील जागेची मर्यादा, लांबीची मर्यादा, खर्चाची मर्यादा या सगळ्या मर्यादेत राहून चांगल्यात चांगली कलाकृती रसिकांसमोर सादर करावी लागते. अफाट खर्च करूनही चित्रपट रसिकांच्या पसंतीला उतरेल याची खात्री सांगता येत नाही.

पैसा, प्रसिद्धी आणि ग्लॅमर या तीन गोष्टींच्या प्रभावाखाली चित्रपटसृष्टी आहे. एक चित्र हजारो शब्दांपेक्षा जास्ती आशय व्यक्त करते आणि चित्रपटात तर अशी असंख्य चित्रांची मालिकाच शास्त्रोक्त आणि कलात्मक रितीने गुंफलेली असते. जी रसीकांना जाग्यावर खिळवून ठेऊ शकते. यामुळेच चित्रपट हे जनसंवादाचे फार महत्त्वाचे असे साधन आहे.

सिनेमा (चित्रपट) ही सर्व कलांची कला आहे. अनेक कलांचा या ठिकाणी मनोहारी संगम पहावयाला मिळतो. भव्य देखावे आहेत, पेंटींग आहे, नेत्रदीपक फोटोग्राफी आहे. नाट्य, नृत्य आणि संगीत हे कथा आणि काव्य यांच्यासह सुंदररित्या गुंफलेले असते. मानवी मनाला सौंदर्याची ओढ आहे; नाविन्याचे आकर्षण आहे तर जुन्याचेही कौतुक आहे. भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ या सर्व काळात डोकावण्याचे आणि

रसास्वाद देण्याचे प्रचंड सामर्थ्य चित्रपट कलेत आहे.

चित्रपटाचे अंतिम वैशिष्ट्य मनोरंजन की समाजप्रबोधन हा एक वादाचा विषय आहे. या बाबत प्रा. मॅक्विल म्हणतात,

**''केवळ मनोरंजनपर माध्यम म्हणून चित्रपटांचा विचार करणे म्हणजे सामाजिक स्वातंत्र्याचा दुरुपयोग करणे होय.'' ...३**

याचा अर्थ असा की, चित्रपट हे प्रबोधनपर माध्यम आहे.

आरंभिच्या काळापासून आजपर्यंत पौराणिक व ऐतिहासिक चित्रपट हे चित्रपट निर्मितीचा गाभा ठरले आहेत. दादासाहेब फाळके यांनी निर्मिलेला 'राजा हरिश्चंद्र' हा पौराणिक होता. इतिहासात रमायला मराठी चित्रपट निर्मात्यांना आवडते. त्यांच्या या प्रवृत्तीवर प्रकाश टाकताना रविप्रकाश कुलकर्णी म्हणतात,

**''एरवी भूतकाळातच जास्त रमण्याचा कल असल्यामुळे असेल, भारतीयांना आपल्या इतिहासाबद्दल जाज्वल्य अभिमान असतो, परंतु त्या तुलनेत ऐतिहासिक साधनांच्या बाबतीत मात्र तो उदासीन असतो. खरं सांगायचं तर निष्काळजीच असतो.'' ...४**

मराठीतील ऐतिहासिक चित्रपट का मागे पडत आहेत त्याचे रहस्य यावरुन उलगडते.

वसंत साठे यांनी म्हटल्याप्रमाणे,

**''इतिहासाने भारतीय चित्रपटाला भरपूर कथाविषय पुरविले आहेत. इतिहास काळातील शूरांचे शौर्य, त्यांच्या लढाया, त्यांचे जय-पराजय, त्यांचा जाज्वल्य देशाभिमान, स्वाभिमान, अहंकार, सूड, प्रेम अशा अनेक अंगांनी त्या कथा भारतीय चित्रपटातून दिसल्या. ऐतिहासिक चित्रपटांची एक फार मोठी परंपराच आपल्याला स्पष्टपणे दिसते.'' ...५**

भारतीय चित्रपटांच्या ऐतिहासिकतेची कितीतरी उदाहरणे सांगता येतील; परंतु त्या काळातीलच नव्हे तर नेहमीच चित्रपटांना नानाविध अडचणीतून पुढे जावे लागले आहे. साठे म्हणतात,

**''काल परवाच्या मानाने १९८०-९० सालात ऐतिहासिक पट कमी निघतात किंवा निघतच नाहीत हे जरी खरे असले तरी अगदी सहाव्या दशकापर्यंत याही चित्रपटांनी एक इतिहास घडविला आहे.'' ...६**

संशोधनाच्या क्षेत्रात चित्रपट हा विषय थोड्या उशीराने समोर आला. त्याचे कारण सांगताना रविप्रकाश कुलकर्णी म्हणतात,

**''एकेकाळी अगदीच दुर्लक्षित असलेल्या चित्रपट ह्या विषयाकडे हळूहळू का होईना अभ्यासकांचे लक्ष जाऊ लागले. समाजाने, विद्यापीठाने देखील चित्रपट या विषयाला मान्यता दिली.'' ...७**

प्रमुख वैशिष्ट्ये सांगताना असे म्हणता येईल की, जीवनाचे प्रतिबिंब चित्रपटात दिसून येते आणि या उलटची बाजूही खरी आहे, ती म्हणजे चित्रपटांचं प्रतिबिंबही जीवनात पडल्याचे अनेक दाखले दिसून येतात.

चित्रपट म्हणजे मानवी भावभावनांचं रसिकतेने चित्रीत केलेले नाट्य होय. मानवी जीवनाच्या विविध भावभावनांचं दर्शन विविध चित्रपटांमधून घडून येतं. विविध भावाविष्कार विविध नातेसंबंध त्यातील प्रेम, जिव्हाळा, शत्रुत्व, आपलेपणा, परकेपणा सर्व काही चित्रपटांतून दिसून येतं. मानवी भावभावना, इच्छा, आकांक्षा, यश, अपयश इ. नाना प्रकारचे पदर चित्रपटातून उलगडले जातात. त्यामुळे अर्भके, मुले, तरुण, तरुणी, मध्यम वयीन स्त्री-पुरुष, वृद्धत्वाकडे झुकलेले स्त्री-पुरुष यांचं जीवनदर्शनच नव्हे तर मृत्यूची ही वेगवेगळी रुपे पडद्यावर चितारलेली आढळतात. एकूणच मानवाच्या जीवनाचे समग्र दर्शन चित्रपटाद्वारे घडून येते.

आबालवृद्धांपर्यंत सर्वांनाच चित्रपट या माध्यमाने आकर्षित केले आहे. त्यामुळेच नट-नट्यांचे राहणीमान, चालचलन इतकेच नव्हे लकबींचीही नक्कल करण्याची प्रवृत्ती दिसून येते. चित्रपटात दिसणाऱ्या गैरकृत्यांची /अपकृत्यांचीही हुबेहुब नक्कल केल्याप्रमाणे अनेक घटनाही दिसून येतात. 'शक्तीमान' या दूरदर्शन मालिकेतील शक्तीमानप्रमाणे वरच्या मजल्यावरुन लहान मुलांनी उड्या मारुन जखमी होण्याच्या घटनाही घडलेल्या आहेत. घरोघरी दूरदर्शन पोहोचला त्या प्रमाणात चित्रपट जरी पोहोचला नसला तरी 'शोले' इ. सारख्या गाजलेल्या चित्रपटांचा प्रभावही दिसून येतो. केशभूषा, वेशभूषा, आहार-विहार या सर्वांवर दिसून येणारा चित्रपटांचा प्रभाव पाहिला की, चित्रपटांचा जीवनावर परिणाम होतो हेही ओघानेच सिद्ध होते.

चित्रपट ही अत्याधुनिक अशी दृक्श्राव्य माध्यमाची कला आहे. ही कला साहित्य, चित्रकला, नृत्य, संगीत, नाट्य आणि शिल्पकला या सर्व कलांचे गुणविशेष घेऊन

तंत्रज्ञानाच्या सहाय्याने गेल्या शतकभरात विकसीत होत गेली आहे. लोकप्रियतेमुळे सांस्कृतिक क्षेत्रात चित्रपटाचे स्थान अनन्य साधारण बनून गेले आहे. मानवी अनुभवांच्या विविध मनोव्यापारांचे वास्तवच नव्हे तर अवास्तव दर्शन घडविण्याचे जबरदस्त सामर्थ्य या कलेत आहे.

सजीवांबरोबर निर्जीवाचेही हुबेहुब चित्रण करण्याचे सामर्थ्य या चित्रपटांत आहे. मानव, मानवेतर पशु-पक्षी, प्राणी इतकेच नव्हे तर या पृथ्वीतलावरील सर्व काही वस्तु, व्यक्ति, वातावरण यांचं हुबेहुब दर्शन घडविण्याचं कसब या कलेद्वारे प्रतीत होते.

मनुष्यमात्राला मोहमयी अशा स्वप्नातील नगरीत फिरविणारी ही सीनेसृष्टी मानवी आयुष्यातील गुंतागुंतीच्या समस्या, समाजातील दारिद्रय, विषमता, युद्ध, मुले, स्त्रीया, दुर्बल यांच्यावर होणारे अत्याचार या सर्वांचे वास्तव दर्शनही घडवते.

वेगवेगळ्या कलाकृती या तांत्रिकतेमुळे जनसामान्यांपर्यंत पोहोचतात. शद्ब, स्पर्श, रुप, रस, गंध या विविध स्तरांवर त्यांचा आस्वाद आस्वादक व चिकित्सक घेत असतो. चित्रपट ही दृक श्राव्य कला आहे. तो एक प्रतिमांचा खेळ आहे; परंतु मानवी मनोव्यापारांशी, भावभावनांशी त्याची नाळ इतकी बेमालुम जुळली आहे की, प्रेक्षक तादात्म्य भावनेतून समरस होतो व त्याला जणू आपण खऱ्या जीवनसृष्टीतच वावरत आहोत असा भास होत राहतो. चित्रपटकलेतील तांत्रिकपणा त्यामुळेच अनुभूतीच्या पातळीवर विसरला जातो. पात्रांचं वावरणं, बोलणं, चालणं अगदी हृदयाच्या गाभ्याशी जाऊन एकरुप होतं. याबाबत अभिजीत देसाई म्हणतात,

**''सामुदायिकरित्या चित्रपट कसा आहे याबाबतचे मत ठरवून प्रेक्षक त्याकडे वळतो हे पाहून दर्शक येतात.''** ...८

चित्रपट ही एक सामान्य माणसांपर्यंत पोहोचलेली मोहमयी कला आहे. लोकांची वैविध्यपूर्ण अभिरुची, संकल्पना, इच्छा, आकांक्षा - तृप्त तसेच अतृप्तही या सर्वांना चित्रपट कलेने एक वेगळे परिमाण दिले आहे. या संदर्भात राजा दिलीप यांनी मार्मिकतेने विवेचन केले आहे, ते म्हणतात,

**''सिनेमा हे मनोरंजनाचे माध्यम असून त्यातून उगाचच गंभीरतेचे, तत्त्वज्ञानाचे डोस पाजण्यात अर्थ नाही, त्यापेक्षा त्यातून प्रेक्षकांना दोन घटका दु:ख, तणाव विसरण्याचे रंजन द्यावे असे ठासून सांगणारा एक वर्ग सदियो पुराना जसा आहे,**

**तसाच सिनेमाद्वारे मनोरंजन कसले करता, त्यामुळे प्रेक्षक स्वप्नरंजनातच रमतो. त्यापेक्षा वास्तवता दाखवणारे चित्रपट बनवावेत, त्यामुळे बुद्धीला खाद्य मिळेल. ते गंभीरच असावेत. असेही सांगणारा वर्ग आहे.'' ...९**

महाभारतातील अश्वत्थामा हे एक दु:खी पिडीत माणसाचे प्रतिक मानले तर या जगातील प्रत्येक मानवप्राणी हा कमी अधिक प्रमाणात अश्वत्थामाच आहे. समर्थ रामदासांनी म्हटल्याप्रमाणे,

**''जगी सर्व सुखी असा कोण आहे, विचारी मना तूचि शोधूनी पाहे.'' ...१०**

त्यामुळे वास्तव जीवनातले दु:ख विसरुन मानवप्राणी स्वप्नातील सुखाच्या मागे धावायचा प्रयत्न करतो. ही स्वप्नाळू दुनिया चित्रपटात तो पाहतो आणि त्यात सत्याचा आभास निर्माण होतो तरीही तो घटका दोन घटका त्यात रमून जातो. याविषयी ग. म. रेगे म्हणतात,

**''प्रेक्षक अशा जगात वावरत असतो की, दृष्य वातावरणात कुठेतरी त्याला आश्रय हवा असतो, स्वत:च्या वास्तव जगातून कुठेतरी दूर जावेसे त्याला वाटत असते. तात्पुरता का होईना सामान्य माणसाला सुटकेचा नि:श्वास टाकल्यासारखे वाटते. त्यांच्या वैयक्तिक जीवनातील तणाव, चिंता इत्यादीपासून तो दूर जातो. ही गोष्ट सर्वसामान्य माणसाच्या जीवनात सातत्याने घडत असते.'' ...११**

चित्रपट हे संस्कृतीचे वाहक असे माध्यम बनले आहे. संस्कृति म्हणजे कला, परंपरा, आचार-विचार व सवयी यांचा अविष्कार म्हणता येईल. आपल्या चित्रपटांवर पुराणकथा, लोककथा, लोककला, संगीत, नाटक, रूढी-परंपरा व संकेत यांचा प्रभाव प्रचंड प्रमाणात आहे असे म्हणण्यापेक्षा या गोष्टी म्हणजे आपल्या चित्रपटाचा आत्मा आहे. शोभा चटर्जींचे निरीक्षण या बाबतीत अत्यंत बोलके आहे.

**''भारतीय संस्कृतीचे घटक असलेल्या साहित्य, संगीत, कला व तत्त्वज्ञान यांचा प्रभाव या संस्कृतीचीच निर्मिती असणाऱ्या चित्रपटसृष्टीवरही पडला आहे. 'माध्यम' म्हणून चित्रपटामध्ये जबदरस्त प्रभावशक्ति असते. हॉलीवुडच्या आक्रमणाने संस्कृतीची ही मुळे उखडली जातात की काय अशी चर्चा केली जात आहे.'' ...१२**

## १.३ मराठी चित्रपटांचे बदलते स्वरुप

दादासाहेब फाळके या मराठी माणसाने पहिला चित्रपट नाशिक येथे १९१३ साली बनवला. याच्या फक्त पंधरा वर्षे आधी चित्रपटाचं तंत्र परदेशात विकसीत झालं होतं. प्रथम मूकपटाचा जमाना इथे अवतरला. त्यामुळे भाषिक चित्रपट किंवा चित्रपटाची भाषा यांचा प्रश्नच नव्हता फक्त निर्माते, दिग्दर्शक मराठी किंवा अमराठी एवढाच फार तर चर्चेचा मुद्दा उपस्थित होऊ शकतो. पहिला मूकपट 'राजा हरिश्चंद्र' दादासाहेब फाळके यांनी निर्माण केला होता. 'सावकारी पाश' हा १९२५ मध्ये बाबूराव पेंटर यांनी दिग्दर्शित केला. भारतातील पहिला बोलपट १९३१ साली तयार झाला. त्यामुळे भाषिक चित्रपट १९३१ नंतरच उदयाला आले.

'सावकारी पाश' हा मूकपट नंतर बोलपटात रुपांतरीत करणेत आला परंतु पहिल्या मूकपटाची सर बोलपटाला आली नाही असे जाणकारांचे मत आहे.

'प्रभात' ने मराठीतच नव्हे तर हिंदीतही एक आगळीवेगळी परंपरा सुरु केली. साठे म्हणतात,

**''बॉम्बे टॉकीज, न्यू थिएटर्स, प्रभात यांचे सर्वश्रेष्ठ चित्रपट हे केवळ रंगमंचावरील नाटकांचे चित्रिकरण म्हणता येतील.'' ...१३**

परंतु यापेक्षा टोकाची आणि बरीचशी पटणारी भूमिकाही साठे यांनी सांगितली आहे.

**''सर्वप्रथम जाणवणारं त्या चित्रपटांचं वैशिष्ट्य म्हणजे त्याचा ध्येयवादी दृष्टीकोन. निखळ मनोरंजन देतानाच त्यांनी अनिष्ट रुढींचा बुरखा फाडून मानवता वादाची न्यायाची व समतेची मूल्ये सातत्याने जपली. एकोणिसाव्या शतकात बहराला आलेली समाजसुधारणेची चळवळ आणि ब्रिटीशांविरूद्ध चाललेला स्वातंत्र्याचा लढा या पार्श्वभूमीवर या चित्रपटांनी मनोरंजनाच्या चौकटीत राहून ही मूल्ये जपताना आपली एक सामाजिक भूमिका वठविली आहे.'' ...१४**

भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात डोकावतांना स्पष्टपणे जाणवते की, कला आणि व्यवसाय या दृष्टीने भारतीय चित्रपटांचा पाया मराठी चित्रपटांनी घातला. अनेक पहिले विक्रम मराठी दिग्दर्शकांच्या चित्रपटांनीच केले.

मूकपटानंतर पहिला मराठी बोलपट प्रभातचा 'अयोध्येचा राजा' १९३२ ला प्रकाशित झाला. विष्णुपंत दामले यांनी ऑडिओ कॉमेक्स साऊंड पद्धतीने त्याचे ध्वनिमुद्रण केले होते. छायालेखनासाठी व ध्वनिलेखनासाठी वेगवेगळ्या निगेटिव्ह प्रथमच वापरण्यात आल्या. सामाजिक बंधन झुगारुन दुर्गा खोटे या घरंदाज घराण्यातील सुशिक्षित स्त्रीने चित्रपटात प्रथम भूमिका केली.

भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात रौप्य महोत्सवाचा पहिला विक्रम भालजी पेंढारकर लिखीत, दिग्दर्शित 'श्यामसुंदर' ने केला.

'अमृतमंथन' चित्रपटासाठी व्ही. शांताराम यांनी जर्मनीहून झूम लेन्स आणून तिचा वापर केला.

१९३७ ते १९४२ ला मराठीचे सुवर्णयुग म्हणता येईल. प्रभातच्या 'कुंकू' या चित्रपटाने या युगाचा मुहूर्त केला.

व्ही. शांतारामनी 'अग्निकंकण'मध्ये नाटकाच्या प्रभावातून सिनेमा मुक्त करण्याचा प्रारंभ केला. बाबूराव पेंटरांच्या 'सावकारी पाश' ने सिनेमा हे शद्बाचे नसून दृश्यात्मक कलामाध्यम आहे, याची प्रचिती दिली. मराठी चित्रपटांनी उत्तम कथांची, साहित्यीक मूल्यांची व नाटकांची उच्च परंपरा जोपासली. थिल्लरपणा येऊ दिला नाही. शांताराम, विनायक व भालजी पेंढारकर हे या सुवर्णयुगाचे आधारस्तंभ ठरले.

'कुंकू'-जरठबाला विवाह, 'माणूस'-प्रेम म्हणजे सर्वस्व आहे असे नाही असा संदेश देणारा चित्रपट; 'शेजारी'-हिंदू-मुस्लिम ऐक्य विषय मांडणारा. असे प्रभातने एकापेक्षा एक सरस चित्रपट निर्माण केले. त्याही काळात 'शेजारी' चित्रपटातील धरण फुटण्याचा देखावा हा ट्रिक फोटोग्राफिचा उत्तम नमुना होता. याचे श्रेय प्रल्हाद दत्त यांना जाते. यानंतर 'तुकाराम', 'गोपालकृष्ण' आणि 'संत ज्ञानेश्वर' हे संतपटही खूप गाजले. ज्ञानेश्वर भिंत चालवतात या स्पेशल इफेक्टची तुलना त्या काळात अलेक्झांडर कोर्डाच्या 'थिव्हज ऑफ बगदाद' मधील गालीचा हवेत फिरतो याच्याशी झाली. प्रभातचा 'माझा मुलगा' यातून भावगीत हा नवीन संगीत प्रकार पडद्यावर आला. कोल्हापूरात मा. विनायकांनी सामाजिक, उपहासात्मक, विडंबनात्मक आणि विनोदी चित्रपटांचे नवे दालनच उघडले. 'धर्मवीर,' 'प्रेमवीर', 'ज्वाला' असे हंस चित्रसंस्थेने चित्रपट दिले.

यानंतर 'नवयुग,' 'अत्रे पिक्चर्स'ने वेगवेगळ्या विषयांना चित्रपटात स्थान दिले.

'रामजोशी व जयमल्हार यांनी मराठी चित्रपटांना नवे वळण दिले. हा सूर पुढे पंचवीस वर्षे टिकला. कारण हा लावणीप्रधान पायंडा खूप लोकप्रिय झाला. हा काळ गावपाटीलकी, ढोलकी, चाळ आणि लावणी यांनी गाजत राहीला अगदी वीट येईपर्यंत.

हा काळ व यापुढीलही काही काळ ग. दि. माडगूळकर, पु.ल. देशपांडे, व्यंकटेश माडगूळकर, ग. रा. कामत या समर्थ लेखकांनी गाजविला.

शांतारामांचा 'अमरभूपाळी' ग्रामीण प्रेक्षकांनी डोक्यावर घेतला. अत्रेंच्या 'श्यामच्या आई'ने (१९५१) केंद्र सरकारने सुरु केलेला राष्ट्रपती सुवर्णपदकाचा सर्वोच्च सन्मान मिळविला. नंतर 'महात्मा फुले'ला ही राष्ट्रपती रौप्यपदक मिळाले.

१९७२ मध्ये व्ही. शांताराम यांनी 'पिंजरा' चित्रपटाद्वारे अपेक्षेबाहेर यश मिळविले हा पहिला मराठी रंगीत चित्रपट.

१९७५ नंतर मराठीला दोन जबरदस्त द्रष्टे दिग्दर्शक लाभले ते म्हणजे डॉ. जब्बार पटेल आणि अमोल पालेकर नाविन्याची ओढ आणि जुन्याची जाणीव असणारे हे दोन समर्थ तरुण दिग्दर्शक.

'जैत रे जैत', सिंहासन' असे एकापेक्षा एक चित्रपट त्यांनी दिले. पटकथाकार विजय तेंडुलकर यांच्या लेखणीचा सुवर्णस्पर्श त्यांना लाभला.

नचिकेत व जयू पटवर्धन या पती-पत्नींनी '२२ जून १८९७' हा वेगळा चित्रपट देण्याचा प्रयत्न केला पण प्रेक्षकांच्या पसंतीस तो उतरला नाही.

स्वत:ला मूल व्हावे म्हणून कोवळ्या मुलींचा बळी देण्याची प्रथा हा मानव हत्या कांडातील धगधगता सामाजिक विषय घेऊन अमोल पालेकरांनी 'आक्रित' काढला पण तोही चालला नाही. नंतर जब्बार पटेलांनी 'उंबरठा' हा सामाजिक आशयघन चित्रपट दिला.

दादा कोंडकेंनी विनोदाच्या आणि द्व्यर्थी संवादाच्या पार्श्वभूमीचे यशस्वी चित्रपट दिले. विनोदाची प्रेरणा आणि परंपरा पुढे सचीन पिळगावकर आणि महेश कोठारे यांनी चालविली पण त्यांचे विनोद घरेलू, संयमी आणि प्रासंगिक स्वरुपाचे होते.

सचिनने 'गोंधळात गोंधळ,' 'नवरी मिळे नवऱ्याला,' 'गंमत-जंमत' व 'अशी ही बनवाबनवी' ही चित्रे दिली. महेश कोठारेचे 'धूमधडाका,' 'दे दणादण' व 'थरथराट' रसिकांना खूपच भावले.

१९९० दरम्यानची परिस्थिती सांगताना साठे म्हणतात,

**''लावणी व तमाशाप्रधान चित्रे मराठीतून हद्दपार झाली. हे या दशकाचे वैशिष्ट्य म्हणता येईल. त्याचप्रमाणे तांत्रिक सफाई वाढली. महेश कोठारेने 'धडाकेबाज' मध्ये फोर ट्रॅक साऊंड व सिनेमास्कोप छायालेखनाचा वापर केला.'' ...१५**

मराठी भाषेतील चित्रपटांची विनोदावरील हुकूमत सांगताना साठे म्हणतात,

**''साठ वर्षांतील मराठी चित्रपटसृष्टीचे इतर भारतीय भाषांतील चित्रपटाहून वेगळेपण कोणते याचा शोध घेतला तर एक वैशिष्ट्य नजरेत भरते, ते म्हणजे विनोदी चित्रपटांचे दालन मराठीइतके दुसऱ्या कोणत्याही भाषेत समृद्ध नाही. जेव्हा जेव्हा मराठी चित्रपटांना मरगळ आली तेव्हा विनोदी चित्रपटांनी मराठीला पुन्हा संजीवनी दिली.'' ...१६**

१९६० ते २००० या कालखंडात मराठी चित्रपटातील बदलत्या स्वरुपाची चर्चा करताना असे लक्षात येते की हे चित्रपट बदलामध्ये गती घेत चालले आहेत.

चित्रपट वास्तवाकडे झुकण्याचा प्रयत्न करीत आहेत पण वास्तव, वास्तव ज्याला म्हणतात ते नेमके आहे तरी काय? चित्रपटातील वास्तव ही एक सापेक्ष संकल्पना आहे. याबाबत अशोक राजवाडे म्हणतात,

**''जेव्हा नवा वास्तववादी दिग्दर्शक म्हणतो की मला प्रेक्षकांशी संवाद साधायचा आहे तेव्हा खरं तर 'संवाद' या शब्दाचा अर्थही संकुचित होत असतो. कारण अशा दिग्दर्शकाची वास्तवाबद्दलची कल्पनाही मर्यादित असते. वास्तव म्हणजे सबोध पातळीवर पूर्णपणे समजली जाणारी वस्तू बनून तिच्यातील संपूर्ण संप्रेषणशीलता प्रेक्षकांपर्यंत पोहोचू शकते, असं तिच्यात गृहीत असतं.'' ...१७**

हे असे बदलते वास्तव आणि मराठी चित्रपटाच्या दिग्दर्शकांना किती गवसले आहे याचाही शोध प्रस्तुत लघु शोधप्रबंधात घ्यावयाचा आहे.

प्रेक्षकाचे वास्तव आणि दिग्दर्शकाचे वास्तव सांगताना ग. म. रेगे म्हणतात,

**''प्रेक्षक अशा जगात वावरत असतो की, दृष्य वातावरणात कुठेतरी त्याला आश्रय हवा असतो, स्वत:च्या वास्तव जगातून कुठेतरी दूर जावेसे त्याला वाटत असते. तात्पुरता का होईना सामान्य माणसाला सुटकेचा निश्वास टाकल्यासारखे वाटते. त्यांच्या वैयक्तिक जीवनातील तणाव, चिंता इत्यादींपासून तो दूर जातो.**

**ही गोष्ट सर्वसामान्य माणसाच्या जीवनात सातत्याने घडत असते.'' ...१८**

मराठी चित्रपट प्रेक्षकाला किती जवळ असतात त्यावर त्यांच्या निर्मितीचे यश अवलंबून आहे. दिग्दर्शक, प्रेक्षक आणि त्यांच्यातील संवाद यांची गुंफण करताना अशोक राजवाडे म्हणातात,

**''संवादाचं मूल्यमापन अनुभवाच्या, गुणवत्तेच्या सहाय्याने करता येईल. अनुभव आणि गुणवत्ता हे शद्ब एकदा वापरले की त्यात अध्याहृत असं आहे की, चित्रपट दिग्दर्शक आणि प्रेक्षक हे दोन भिन्न पातळ्यांवर असूनही कोणत्यातरी एका संबंधाने बांधले गेले आहेत.'' ...१९**

चित्रपट हा समाजाचा आरसा आहे. त्यामुळे समाजाचे सामान्य माणसाचे जीवन चित्रपटात दिसले पाहीजे हे ओघानेच आले. सामान्य माणूस हा चित्रपटाचा केंद्रबिंदू आहे. याबाबत अत्रधूत परळकर म्हणतात,

**''आपल्या देशातील सामान्य माणूस त्याच्या भोवतालचे जग व त्याच्या समस्या हे नीट समजून घ्यायचा प्रयत्न नव्या दिग्दर्शकांनी केला... भारतीय चित्रपट प्रथमच व्यक्तिगत कहाण्या सांगायचे सोडून, विशिष्ट सामाजिक वर्गाबद्दल आणि वर्गाविरुद्ध धीटपणे बोलू लागला.'' ...२०**

हे झाले भारतीय चित्रपटाबद्दल. त्यातल्या त्यात हिंदी चित्रपटाबद्दल, परंतु मराठी चित्रपटाने सामान्य माणसाला किती न्याय दिला हा विचार करण्याचा मुद्दा आहे.

इ.स. २००१ पासून पुढे मराठी चित्रपटांचे विषय अधिक वास्तववादी, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनप्रवाहाशी निगडीत बनत चालले आहेत.

मराठी चित्रपटातील प्रयोगक्षमता वाढत चालली आहे. ऑस्करपर्यंत धडक मारणारे 'श्वास' सारखे चित्रपटही निर्माण होऊ लागले आहेत. देवकी, झंझावात, आधारस्तंभ, दहावी फ, वास्तूपुरुष, नॉट ओन्ली मिसेस राऊत, अनाहत, देवदासी, पांढर, देवराई, चकवा तसेच सावरखेड एक गाव इ. सन्माननीय उदाहरणे पाहता मराठी चित्रपट साचेबद्ध चौकटीतून बाहेर पडून एका नवीन दिशेने झेपावत आहे.

## १.४ मराठी चित्रपट निर्मिती प्रक्रिया

**चित्रपट निर्मिती प्रक्रिया :**

चित्रपट निर्मितीची प्रक्रिया निर्मात्यापासून सुरू होते. कारण चित्रपट निर्माण करण्याची

संकल्पना कुणाच्यातरी डोक्यात जन्मावी लागते. मग त्यादृष्टीने जुळवाजुळव सुरू होते. अर्थव्यवस्थेसह, चित्रपटाची सर्व जुळवाजुळव करून चित्रपट आकाराला आणणे आणि प्रदर्शित करून किंवा करवून नफ्या-तोट्याला जबाबदार राहणारा निर्माता असतो.

निर्मात्याला जर चित्रपट आणि चित्रपटतंत्राविषयी माहीती असेल तर तो स्वत:च यातील दिग्दर्शनाचीही बाजू सांभाळेल, म्हणजेच निर्माता-दिग्दर्शक ही एकच व्यक्ति असू शकते. चित्रमहर्षी दादासाहेब फाळके हे निव्वळ निर्माते दिग्दर्शकच नव्हे तर त्यांनी कथा, पटकथा, संवाद, संगीत, सेटींग अशा बऱ्याच बाजू स्वत:च सांभाळल्या होत्या.

निर्माता स्वत: कथाविषय निवडतो किंवा दिग्दर्शकाची निवड करून त्याच्यामार्फत कथेपासून पुढचे सर्व सोपस्कार करवून घेतो. आपल्या कथानकाला, कथाविषयाला न्याय देणारा, कमी खर्चात चांगल्यात चांगला चित्रपट तयार करून देणारा, शक्यतो नावारूपाला आलेला असा दिग्दर्शक निवडला जातो.

चित्रपटांचे मुख्य दोन विभाग आहेत.

**चित्रपट**

| Fiction | Nonfiction |
|---|---|
| **कथानक प्रधान** | **इतर** |
| १) ऐतिहासिक | १) Documentary माहितीपट, वृत्तपत्र |
| २) पौराणिक | २) News reals वार्तापत्र |
| ३) सामाजिक | ३) Educational & Instructional films. शैक्षणिक व माहीतीप्रधान |
| ४) वैज्ञानिक | ४) Motivational & Advertising films. जाहिरातपट |
| ५) ॲनिमेशन | ५) Animation |
| ६) संमिश्र रंजक | |

चित्रपट निर्मिती प्रक्रिया ही तीन मुख्य घटकांतून आकाराला येते. त्याचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे -

### चित्रपट निर्मिती घटक

| चित्रीकरणपूर्व<br>Preshooting,Preproduction | प्रत्यक्ष चित्रीकरण<br>Actual shooting<br>Production process | चित्रीकरण पश्चात्<br>Post shooting/ Post<br>Production |
|---|---|---|
| (१) आर्थिक जुळणी, Finance | दृष्ट्यांतर्गत बाबी | (१) प्रोसेसिंग |
| आर्थिक सहाय्य इ. | (१) सेटींग | (२) रश प्रिंट |
| (२) दिग्दर्शकाची निवड | (२) प्रकाश योजना | (३) एडिटिंग-संकलन |
| (३) कथा-पटकथा संवाद | (३) रंगभूषा Make-up | (४) डबिंग |
| (४) गीते, संगीत | (४) वेषभूषा Drapery | (५) पार्श्वसंगीत Background Music |
| (५) चित्रीकरण स्थळे पाहणी Location hunting, Sight seeing | (५) चित्रीकरणापूर्वीचा सराव Rehercel | (६) तयार प्रत Final Print |
| (६) तंत्रज्ञ, कलाकार यांची निवड | (६) कलाकारांची अभिव्यक्ती | (७) ट्रायल |
| (७) कच्ची फिल्म Raw stock | (७) चित्रीकरण | (८) सेन्सॉर |
| | (८) ध्वनी मुद्रण | (९) प्रदर्शन |
| | | (१०) वितरण व्यवस्था |
| | | (११) प्रसिद्धी व्यवस्था |

## चित्रीकरणपूर्व घटक :

यामध्ये आर्थिक जुळणी करणे हा सर्वात महत्त्वाचा भाग. स्वत:चे भांडवल, भागीदारी, कंपनी तयार करणे, को ऑप. संस्था तयार करणे किंवा N.F.D.C. सारख्या सरकारी संस्थांकडून अर्थसहाय्य मिळविणे इ. गोष्टी येतात. विभागवार प्रदर्शनाचे हक्क विकूनही चित्रीकरणापूर्वी पैसे उभे करता येतात.

दिग्दर्शकाची निवड केल्यानंतर कथा निवड व कथेवरून पटकथा संवाद असे रूपांतर

केले जाते. चित्रपटाचा सिनॅरिओ म्हणजे चित्रकथा तयार केली जाते. यानंतर गीते तयार करून घेतली जातात. दिग्दर्शकाची निवड झाल्यानंतर तो प्रथम आपल्या सहकाऱ्यांची (Assistants) ची निवड करतो. साधारणपणे तीन ते चार असिस्टंटस् असतात. यानंतर निर्मिती व्यवस्थापक (Production Manager ) ची नेमणूक केली जाते. तोही आपले दोन ते तीन असिस्टंटस् नेमतो. चित्रपटासाठी लागणारी वाहनव्यवस्था, चहापाणी, जेवण व्यवस्था, लागणाऱ्या वस्तू, तसेच शूटींगसाठी लागणारे प्राणी व मनुष्यबळ या सगळ्यांची व्यवस्था करण्याची जबाबदारी निर्मिती व्यवस्थापकाकडे असते. गीतांना संगीत दिग्दर्शकाकडून चाली बसवून त्याचे ध्वनीमुद्रण केले जाते. यानंतर दिग्दर्शक आणि निर्माता मिळून तंत्रज्ञ आणि कलाकारांची निवड करतात. मुख्य कलाकार, चरीत्र अभिनेते, इतर छोटी-मोठी पात्रे यांची निवड केली जाते. कॅमेरामन, कला दिग्दर्शक, नृत्यदिग्दर्शक, फाईटस् दिग्दर्शक, रंगभूषाकार, वेषभूषाकर कलाकारांचे असिस्टंटस् इ. सर्वांची नेमणूक केली जाते.

यानंतर दिग्दर्शक आणि त्याचे सहाय्यक एकत्र बसून पटकथेवर विचार करतात. त्यातील कलाकार, प्रसंग व चित्रीकरण स्थळे यांचा विचार केला जातो. निरनिराळ्या याद्या तयार केल्या जातात. उदा.

**कलाकारांच्याप्रमाणे यादी :**

| कलाकार Artist | चित्रीकरणाची तारीख Shooting Date | प्रसंग Scene | स्थळ Location | साहित्य Property |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

**चित्रीकरण स्थळांप्रमाणे यादी :**

| चित्रीकरण स्थळ Location | प्रसंग Scene | चित्रीकरण तारीख Shooting date | कलाकार Artists | साहित्य Property |
|---|---|---|---|---|
| | | | | |

अशा याद्या चित्रीकरणाच्यादृष्टीने एका दृष्टीक्षेपात बरीच माहीती देतात. त्यामुळे नियोजन करणे सोयीचे होते.

यानंतर दिग्दर्शक, छायाचित्रकारांना बरोबर घेऊन चित्रीकरण स्थळांना भेटी देतात. याला Location hunting किंवा Sight seeing असे म्हणतात. कथानकातील प्रसंग कोठे चित्रीत करायचे, तेथे त्याप्रमाणे वातावरण आहे का ? चित्रीकरण करण्यायोग्य त्या जागा आहेत का ? याची पाहणी चित्रीकरणापूर्वी करून खात्री केली जाते. योग्य वाटल्यास त्या स्थळांच्या संबंधीत परवानगी, विद्युत् व्यवस्था, साहित्य यांची जुळणी केली जाते. चित्रीकरणासाठी लागणाऱ्या वस्तुंची जुळवाजुळव आणि कच्ची फिल्म घेऊन ठेवली जाते. कला दिग्दर्शक निरनिराळे सेटस्, झोपडी, दवाखाना, स्विमींग पूल, पोलीस स्टेशन इ. गोष्टींची तयारी करतो. शूटींग आऊट डोअर की इनडोअर याप्रमाणे पूर्वतयारी केली जाते.

कलाकारांसाठी लागणारे कपडे, त्यांची शिलाई इ. बाबी पूर्ण केल्या जातात. कलाकारांची व तंत्रज्ञांची निवड करतानाच त्यांच्या उपलब्धतेविषयी व तारखांविषयी विचार करून त्यांना साईनिंग अमाऊंट किंवा आगाऊ रक्कम देऊन त्यांच्याशी करार केले जातात. इथपर्यंत चित्रीकरणपूर्व तयारी होते.

**प्रत्यक्ष चित्रीकरण :**

कला दिग्दर्शक झोपडी, हॉस्पीटल, दुकान, पोलीस स्टेशन इ. सेटस् उभे करतो. सर्व चित्रीकरणाच्या स्थळावर जमतात. छायाचित्रकार आणि लाईटिंग विभाग (Director of Photography) त्यांची त्यांची कामे पाहतात. चित्रीकरणाच्या दृष्टीने लाईटिंग केले जाते. कलाकारांची रंगभूषा आणि वेशभूषा केली जाते आणि कलाकार चित्रीकरणासाठी तयार होतात.

चित्रीकरण करावयाच्या प्रसंगाची प्रत कलाकारांना दिली जाते. कलाकार त्याप्रमाणे तालीम करतात. असिस्टंट दिग्दर्शक किंवा दिग्दर्शक कलाकारांची तालीम समाधानकारक आहे का ते पाहतात. गरज वाटल्यास सूचना करून बदल करायला लावतात. ही तालीम किंवा रंगीत तालीम लाईटींगपूर्वी व सर्व लाईटिंग झाल्यावर दोन्ही वेळेला करतात. छायाचित्रकार कॅमेऱ्याच्या हालचालींसह चित्रीकरण कसे करता येईल याचीही तालीम करतात.

यानंतर प्रत्यक्ष चित्रीकरणाला सुरूवात होते. सायलेन्स प्लीज, लाईटस् ऑन, साऊंड,

कॅमेरा, क्लॅप, ॲक्शन या सूचनानंतर कलाकारांची अभिव्यक्ति आणि त्याचे चित्रीकरण होते.

चित्रीकरण आणि ध्वनीमुद्रण एकाच वेळी केलं जातं. क्लॅप किंवा फट्मार म्हणजे एक प्रकारची चित्रपटाची दैनंदिनीच (Diary) होय.

दिग्दर्शक, कॅमेरामन तसेच कलाकारांसह संबंधीत सर्वांच्या पसंतीला येईपर्यंत (O. K. Shot) परत परत चित्रीकरण (Retake) केले जाते.

**चित्रीकरण पश्चात् प्रक्रिया :**

यानंतरच्या प्रक्रियेसाठी चित्रीकरण केलेल्या ध्वनीच्या आणि चित्रीकरणाच्या फिल्मस् लॅबोरेटरीमध्ये रासायनिक संस्कार करण्यासाठी घेऊन जातात. या ठिकाणी फिल्मवर प्रोसेसिंग केले जाते. निगेटिव्हची पॉझिटिव्ह बनविली जाते. ओ.के. शॉटस् (पसंत असलेले चित्रीकरणातील तुकडे) ठेऊन बाकीचे काढून टाकतात. उरलेली O. K. Shots ची फिल्म एकत्र जोडून रश प्रिंट तयार केली जाते. संकलक चित्रपटाच्या प्रभावाच्या दृष्टीने विचार करून या फिल्मवर संस्कार करून वेगवेगळे तुकडे परीणामकारक होतील असे जोडतो, चित्रात चित्रे मिसळणे, वाईप, डिझॉल्व, फेड इन, फेड आऊट सुपर इंपोझिशन आणि रिॲक्शन शॉटस् टाकणे इ. प्रकारे तो फिल्म जोडण्याचे संस्कार करतो. यानंतर कलाकारांकडून डबिंग केले जाते. समोर पडद्यावर चित्रीकरण दाखवले जाते. हेडफोनद्वारे पूर्वी बोललेले ऐकून व समोर ओठांची हालचाल पाहून त्याप्रमाणे पुन्हा पण इच्छित परिणाम साधण्याच्यादृष्टीने कलाकार संवाद बोलतात. त्यांचे पुन्हा ध्वनिमुद्रण (Sound Recording) केले जाते.

यानंतर या फिल्मवर स्पेशल इफेक्टस् व पार्श्वसंगीताची जोड दिली जाते. निरनिराळ्या आवाजांच्या ध्वनिमुद्रण टेपस् एका टेपवर एकत्र करून चित्र आणि ध्वनी या एका फिल्मवर घेतल्या जातात. अशा तऱ्हेने तयार झालेल्या Final Print ला Married Print असे म्हणतात.

सर्व जाणकारांसमोर तसेच तंत्रज्ञ आणि कलाकारांसमोर ही फिल्म पाहिली जाते याला ट्रायल म्हणतात. जाणकारांच्या सूचना ऐकून दिग्दर्शकास योग्य वाटल्यास तो यात बदल करतो. यानंतर सेन्सॉर बोर्डाच्या सदस्यांना चित्रपट दाखविला जातो. या सदस्यांच्या सूचनांप्रमाणे बदल केल्यानंतर प्रौढांसाठी - A आणि सर्वांसाठी - U अशा दोन प्रकारच्या सर्टीफिकेटस् पैकी योग्य ते सर्टीफिकेट सेन्सॉर बोर्ड देते.

तयार झालेला चित्रपट वितरकाकडे कराराने वितरणासाठी दिला जातो. त्याची प्रसिद्धी केली जाते. यानंतर मिळालेल्या तारखांप्रमाणे हा चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होतो. पहिल्या खेळाला कलाकार, तंत्रज्ञ, निमंत्रीत व पत्रकार उपस्थित राहतात. हा उद्घाटनाचा सोहळा प्रसिद्धी मिळेल अशा तऱ्हेने केला जातो. वृत्तपत्रे, नियतकालिके, नभोवाणी, दूरदर्शन, केबल यावर जाहीराती केल्या जातात. निरनिराळे हक्क विकून पैसा गोळा होतो. तसेच चित्रपटगृहातूनही उत्पन्न मिळते. वाहीन्यांच्यावरील प्रदर्शनाचे हक्क देऊनही उत्पन्न मिळते. यानंतर शेवटचा भाग म्हणजे प्रेक्षकांकडून-रसिकांकडून मिळणारा प्रतिसाद आणि प्रतिक्रिया.

## १.५ प्रमुख समस्यांची ओळख

या समस्यांची ओळख चित्रपटसृष्टीचा इतिहास पाहता होते.

सुरुवातीच्या काळात चित्रपटासाठी स्त्रीया काम करणे अवघड होते; कारण कुलीन स्त्रीया या रंगभूमी, चित्रपट अशा क्षेत्रांना वर्ज्य समजत होत्या. समाजाची त्यावेळी तशी धारणा होती. नाटकात नट पुरुषच स्त्रीयांच्या भूमिका करीत. म्हणून सुरुवातीच्या काळात नाचगाणे करणाऱ्या तसेच वेश्यांनाही चित्रपटात काम करण्यासाठी प्रवृत्त केल्याचे दाखले आहेत.

तथापी दुर्गा खोटे सारख्या कुलीन सुशिक्षीत स्त्रीने अशाही काळात चित्रपटात भूमिका केल्या व नंतर हळूहळू ही समस्या राहीली नाही.

**भांडवल समस्या :** चिपटाच्या सुरुवातीच्या काळापासून आजच्या घटकेपर्यंतची ही सर्वात मोठी समस्या चित्रपट व्यवसायासमोर आहे. नामदेव व्हटकर म्हणतात,

**''आपण सिनेमाकडे एक करमणूक म्हणून पाहतो; परंतु निर्माता त्याची कथा निवडताना तो एक धंदा म्हणूनच प्रथम पाहतो.'' ...२१**

निर्मात्याच्या दृष्टीने धंदा व त्यातून पैशाची प्राप्ती हे महत्त्वाचे आहे पण चित्रपट व्यवसाय मुळातच बेभरवशी मानला जातो. कथा-पटकथा संवादापासून सर्व गोष्टी काटेकोरपणे व्यवस्थित असल्या तरीही चित्रपट चालेल याची खात्री नाही. या उलट सर्वच किंवा बऱ्याच बाजू सुमार असल्या तरी प्रेक्षक त्या चित्रपटाला डोक्यावर घेतो. चित्रपटाच्या यशाची नाडी कुणालाही सापडलेली नाही. यामुळेच या व्यवसायात भांडवलाची समस्या वारंवार निर्माण होते. सध्या इलेक्ट्रॉनिक मिडीया व अनुदान

योजनांमुळे किमान भांडवल तरी सुरक्षित परत मिळेल याची काही प्रमाणात खात्री निर्माण झाल्याने अमराठी भांडवलदार व कॉर्पोरेट कंपन्या मराठी चित्रपटांसाठी भांडवल घेऊन उभ्या आहेत.

**कलावंतांच्या समस्या :** याबाबतीत मराठी कलावंतांचा मराठी तसेच हिंदी चित्रपटसृष्टीवरही पगडा आहे. मराठीकडे समृद्ध मराठी व्यासपीठ व नाट्यसृष्टी आहे तसेच दूरदर्शन इ. मालिकातूनही असंख्य नवे नवे चेहरे चित्रपटासाठी उपलब्ध होत आहेत. या परंतु नव्या पद्धतीत नव्याच समस्या कशा निर्माण होत आहेत या बाबतीत शेवाळे म्हणतात,

''हल्ली वर्षाकाठी एका निर्मात्याला एक देखील चित्रपट निर्माण करणे अवघड झाले आहे. चित्रपट करार पद्धतीमुळे कलावंत वेगवेगळ्या निर्मात्यांशी करार करीत आहेत व त्याचाच परिणाम म्हणजे तारखा देण्याची, मिळविण्याची केवीलवाणी धडपड दिसून येते. शिवाय एक कलावंत चारसहा ठिकाणी भूमिका करीत असल्याकारणाने त्याचे लक्ष (अभिनय) एका चित्रपटावर केंद्रीत होऊ शकत नाही. आता आऊट डोअर शुटींग म्हणजे नटनटींचा ताफा, त्यांच्या मनाप्रमाणे आवडी पुरविणे, बाळगलेल्या कुत्र्याची देखील लाडाची सोय पुरविणे, पंचतारांकीत हॉटेलमधील जेवण इ. गोष्टी अत्यंत गरजेच्या म्हणून मान्यता पावलेल्या आहेत. कुणीही उठावे, पैसा उभारावा व चित्रपटनिर्मिती करावी, कुणीही उठावे दिग्दर्शन करावे, कुणीही कथा संवाद लिहावेत, कुणीही अभिनय क्षेत्रात उतरावे...''

तंत्रज्ञांच्या बाबतीतही अशीच समस्या निर्माण झाली आहे. एकाच वेळी अनेक चित्रपटांचे चित्रीकरण चालू असतांना उपलब्ध तंत्रज्ञांनाही तारखा सांभाळणे म्हणजे तारेवरची कसरत झाली आहे.

**नव्या तंत्राची यंत्रसामुग्री :** दर दिवसाला यांत्रिक युग बदलत चालले आहे. चित्रीकरणांपासून चित्रीकरण पश्चात् प्रक्रिया सगळ्याच संगणकीकरणातून जात आहेत. अत्यंत महाग अशी कॅमेऱ्यापासून, रेकॉर्डींगपर्यंतची यंत्रणा होत चालली आहे. यांचा खर्चही अवाढव्य होत चालला आहे.

मराठी नाटके आणि हिंदी चित्रपटातील भव्यता, झगमगाट यांचाही परिणाम मराठी चित्रपटावर होतो आहे.

मराठी जनतेची मराठी चित्रपटांबद्दलची उदासीनता ही या व्यवसायाला खूप मारक आहे.

**वेगवेगळ्या चित्रपट वाहिन्या** : यांचा परिणामही घातक होत चालला आहे. दिवसेंदिवस नवनव्या चॅनेल्सची भर पडत चालली आहे. आपली कामे करत करत घरबसल्या करमणूक याची लोकांना सवय पडत चालली आहे, त्यामुळे खर्च करुन, त्रास घेऊन थिएटरकडे जाण्याचे श्रम घ्यायला रसीक तयार नाहीत.

वृत्तपत्रे, माध्यमे यांचाही मराठी चित्रपटांकडे पाहण्याचा दृष्टीकोन फारसा आशादायक नाही. अशा या काही प्रमुख समस्या मराठी चित्रपट व्यवसायाला भेडसावत आहेत.

## १.६ अभ्यासाचे महत्त्व -

चित्रपट हा समाज जीवनाचा आरसा आहे. कलेचा संबंध समाजाशी असतो. चित्रपट ही असंख्य कलांच्या समूहाने बनलेली कला आहे. धार्मिक, पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, विनोदी, व्यंगपट इ. बरोबर राष्ट्रीयतेचा प्रसारही सिनेमाद्वारे केला गेला आहे आणि सदासर्वकाळ तो केला जाणारच आहे.

शेवाळे म्हणतात,

**''बोलपट हे सुद्धा वाङ्मयच आहे. फरक हाच की शद्वाच्या सहाय्याने न मांडता अभिनय, नृत्य, संगीत, दृष्य इ. च्या सहाय्याने ते लोकांपुढे सादर केले जाते.''** ...२३

चित्रपटांनी समाजाची सारी रचनाच बदलून टाकली आहे. शाळा चालवून आणि पुस्तकी ज्ञानानेही जे लवकर घडले नसते ते चित्रपटाने झटपट घडविले आहे. या बाबतीत-

**''लोकमान्य टिळकांनी चित्रपट दिग्दर्शक बाबूराव पेंटर यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी म्हटले होते की, चार पुस्तके वाचून जे ज्ञान प्राप्त होणे कठीण आहे ते दोन तासांच्या चित्रपटान्वये झटकन होऊ शकते.''** ...२४

समाजात बदल घडवून आणण्याची ताकद चित्रपट माध्यमात आहे. त्याचा योग्य वापर झाल्यास शंभर लेखण्या जे करु शकणार नाहीत ते या माध्यमान्वये एका चित्रपटाद्वारे घडू शकते.

दिवसेंदिवस चित्रपटाचा अविष्कार, विस्तार आणि प्रदर्शन खूपच लोकप्रिय झाले आहे. एक करमणूक म्हणून भारतीयांच्या जीवनात आज सिनेमाला आगळे स्थान प्राप्त झाले आहे.

मराठी भाषेतील चित्रपट संक्रमणावस्थेतून जात आहेत, त्यांना स्थिरस्थावर करण्यासाठी नवीन दृष्टीकोनाची गरज आहे.

मराठी भाषेतील चित्रपटांना समृद्ध परंपरा असूनही वर्तमानकाळात इतर भाषिक चित्रपटांपेक्षा ते मागे आहेत. या मागे अनेक कारणे आहेत. कल्पकतेतील नाविन्य व्यावसायिक धाडस आणि आर्थिक सक्षमता यांच्या अभावामुळे मराठी चित्रपट निर्माते नव्या स्पर्धेच्या जगात दमदारपणे आणि आत्मविश्वासाने उभे राहू शकत नाहीत असे दिसून येते. काही सन्माननीय अपवाद जरूर आहेत. दिवसेंदिवस परिस्थितीत आशादायक बदल होत चालले आहेत. काही अपवाद वगळता मराठी चित्रपट साचेबद्ध स्वरूपाचा जाणवतो आहे. या चित्रपटांचे स्थितीशील रूप गतीशील कसे करता येईल हा खरा प्रश्न आहे. चित्रपटाचे कथानकातील नाविन्य, कथानकांची आगळी वेगळी हाताळणी आणि मांडणी तसेच कुशलतेने तांत्रिक सादरीकरण या सर्वच बाबतीत हिंदी आणि इतर भाषिक चित्रपटांच्या तुलनेत मराठी चित्रपट अनेक वर्षे मागे आहे हा घोष सतत कानावर पडतो आहे. दिवसागणिक मराठी चित्रपट वेगळ्या वळणाने चालू लागला आहे, त्याला जाग आली आहे, चेतना आली आहे; परंतु या गतीत वाढ होण्यासाठी काय करता येईल? याची कारणमिमांसा प्रस्तुत लघु शोध प्रबंधात करावयाची आहे.

**चित्रपट संवाद व जनसंवाद** : भाव-भावना, आचार-विचार, संकल्पना यांची परस्परातील देवाण-घेवाण म्हणजे संवाद अशी एक सोपी सुटसुटीत संवादाची व्याख्या आहे. व्यक्तिगत स्वरूपात एका व्यक्तीने एका किंवा काही व्यक्तींशी साधलेला हा संवाद होय. परंतु जनमाध्यमाच्याद्वारे असंख्य लोकांपर्यंत दिला जाणारा संदेश म्हणजे जनसंवाद होय.

संवादशास्त्रात चित्रपटांच्या अभ्यासाला महत्त्व आहे. कारण चित्रपटाने संवादाची नवी भाषा निर्माण केली, वेगळा आकृतीबंध वापरात आणला. विशेषत: सुरूवातीच्या मूकपटांच्या बाबतीत हे विशेषत्वाने प्रत्ययाला येते. हलत्या चित्रांच्या चौकटी (Frame) तून प्रगल्भ संदेश व कलात्मक आनंद देणे हे संवाद तंत्रातील उच्च दर्जाचे कौशल्य आहे.

कलावंतांच्या सर्जनशीलतेला नवे वळण मिळाले व नव्या दिशा लाभल्या. मूकपटाचे बोलपटात रूपांतर झाल्यावर तर त्यात एका वेगळ्या शक्तीचा संचार झाला. श्राव्य माध्यमाची ही शक्ती, जिच्यासाठी रसिकांनी साक्षर असणे गरजेचे नाही. मनाला भिडणारे, मनाशी सुसंवाद साधणारे, उत्कृष्ट नाट्य परिणाम साधणारे संवाद चित्रपटात आले. सिनेसंगीत म्हणजे तर दुधात साखरच. चित्रपटाची व चित्रपटसंगीताची एक नवी संस्कृती निर्माण झाली. ज्या गोष्टी किंवा जी दृष्ये, स्वप्नभूमी कधी पाहिली नाही व सामान्य माणसाच्या दृष्टीने शक्यही नाही ती पाहण्याची संधी चित्रपटांमुळे कमीतकमी वेळेत आणि कमीतकमी खर्चात मिळाली. राजकीय व सामाजिक विचारांच्या प्रसाराचे प्रभावी साधन म्हणूनही चित्रपटांचा मोठा उपयोग केला गेला. संस्कृती शिक्षणाबरोबरच संस्कृतीवर्धनाचे आणि संस्कृतीजतनाचे कार्यही मोठे आहे. चित्रपटातून मिळणाऱ्या गोष्टीरूप संदेशाने नकळत समाजशिक्षण व समाजप्रबोधनही साध्य होते. एकूणच चित्रपटाचा मानवी समाजावर फार मोठा प्रभाव आहे.

चित्रपटातून साधला जाणारा संवाद हा एकमार्गी संवाद होय. तसेच हा संवादही अपरिवर्तनीय आहे. समोर दाखविला जात असलेला चित्रपट पाहणे एवढेच प्रेक्षकांच्या हाती असते. नाटकात समोरासमोर प्रतिसाद देणे आणि घेणे घडते. चित्रपटात साध्य होऊ शकत नाही, कारण समोर पात्रांच्या प्रतिमा असतात. तो छाया प्रकाशाचा खेळ असतो. समोर जिवंत माणसे नसतात. प्रतिसाद जसा होकारार्थी किंवा चांगला तसाच नकारार्थी किंवा विरूध्द/वाईटही असू शकतो. पसंतीची पावती आणि नापसंतीची पावतीही त्याच वेळी (Instant) त्याच ठिकाणी देता येत नाही. नापसंती असेल तर चित्रपटगृहातून उठून बाहेर जाणे, राग येत असेल तर हुल्लडबाजी करून चित्रपटाचा खेळ बंद पाडणे किंवा फारच प्रक्षोभक असेल तर पडदा व चित्रपटगृहात मोडतोड, जाळपोळ करणे असा प्रतिसाद प्रेक्षकांचा असू शकतो. हशा-टाळ्यांनी दिलेली पसंतीची पावती किंवा नापसंतीची पावती निर्जीव फिल्मबाबत कशी द्यायची हा प्रश्नच राहतो. या निर्जीव पडद्यावर त्याचा काही परिणाम होणार नाही. फार तर या प्रतिसादाची दखल घेऊन निर्माते, दिग्दर्शक पुढच्यावेळी धडा घेऊ शकतात. अपवादात्मकरित्या एखादा निर्माता प्रेक्षकांच्या भावना लक्षात घेऊन कसाबसा शेवट बदलतो.

यापेक्षा नाटकाची परिस्थिती फार वेगळी असते. कारण जिवंत पात्रे आपली कला

प्रेक्षकांसमोर सादर करीत असतात. एकूण नाट्यप्रयोगावर आणि नाटकावरील प्रत्येक पात्रावर प्रेक्षकांच्या प्रतिसादाचा परिणाम होत असतो. या प्रतिसादाप्रमाणे नाटकाची रंगत वाढत तरी जाते किंवा कमी तरी होत जाते. संदेशवहन समोरासमोर दोन्ही बाजूंकडून होत असते. काही तंत्रज्ञ आणि कलाकारांच्यामते नाटक (व्यासपीठावरील प्रत्यक्ष कार्यक्रम - संगीत, भाषणसुद्धा) जिवंत नाट्य असल्याने त्याचा प्रभाव चित्रपटापेक्षा अधिक खोल व जास्त काळ टिकणारा असू शकतो. म्हणूनच कित्येक रसिकच नव्हे तर कलाकारसुद्धा नाट्यकलेचे चाहते आणि भोक्ते आहेत त्यांना कलेचा जिवंत अविष्कार सादर करायला व सादर होत असताना आस्वाद घ्यायला आवडतो. समोरासमोरील नाट्यात एक मानसिक खळबळ, उत्साह तसेच भाव-भावनांचा सुंदर खेळ रंगतो म्हणून कित्येक कलाकार दूरदर्शन किंवा चित्रपट यातील कला सादरीकरणापेक्षा नाटकात जास्त रममाण होताना दिसतात.

चित्रपट हे पडद्यावरील काव्य आहे तसेच नाट्यही आहे. किंबहुना चित्रपटातील नाट्य रंगले तरच चित्रपटही प्रभावी होतो. त्यामुळे गद्य, पद्य (काव्य आणि गीत), संगीत आणि नाट्य या सर्वांचे मनोहारी इंद्रधनुष्य म्हणजेच चित्रपट म्हणता येईल.

## १.७ भावी दिशा

चित्रपट हे पडद्यावरील काव्य आहे तसेच ते पडद्यावरील नाट्यही आहे. किंबहुना चित्रपटातील नाट्य रंगले तरच चित्रपटही प्रभावी होतो. त्यामुळे गद्य, पद्य (काव्य), गीत, संगीत आणि नाट्य या सर्वांचे इंद्रधनुष्य म्हणजे चित्रपट म्हणता येईल.

चित्रपट निर्मिती म्हणजे अनेक अडथळ्यांची शर्यत आहे. हिंदीच्या तुलनेत मराठी दिग्दर्शकांना अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागते.

त्यामुळे सध्या मराठी चित्रपट निर्मिती ही आव्हानात्मक होत चालली आहे. १.५ मध्ये आपण प्रमुख समस्यांची ओळख करून घेतली आहे. या समस्यांचं निराकरण करण्याची जबाबदारी निर्माते, तंत्रज्ञ, कलावंत इतकेच नव्हे तर रसीकांवरही आहे. सक्षम माध्यमे याबाबतीत अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. शासनसुद्धा होकारात्मक दृष्टीने अनेक प्रकारे मराठी चित्रपट निर्मितीस पोषक वातावरण निर्माण करू शकते.

सर्व गोष्टींचा साकल्याने विचार केल्यास भावी काळात मराठी चित्रपटांचे पुन्हा एकदा सुवर्णयुग निर्माण होऊ शकेल.

## १.८ नवे प्रवाह

यापुढे मराठी चित्रपटांनी नव्या प्रवाहत झोकून देणे अपरिहार्य बनले आहे. एकदा एक फॉर्म्युला चालला की वीट येईपर्यंत, नकोसा होईपर्यंत तोच तोचपणा करणे आता सोडून देणे गरजेचे आहे.

- अजाण बालके, स्त्री भ्रूण हत्या,
- मानवांनी इतर मानव समूहांवर केलेले हल्ले,
- मानसिक तसेच शारीरिक स्त्री शोषणाचे विविध त्रासदायक आणि किळसवाणे प्रकार,
- राज्यकर्त्यांची उदासीनता,
- पुढाऱ्यांच्यामध्ये नेतृत्वाचा अभाव,
- समाजाचे होणारे चौफेर शोषण व या सगळ्यांतून होरपळणारे सर्वसामान्य नागरिक- असे नवे नवे प्रवाह यापुढे मराठी चित्रपटातून चितारले गेले तर रसीक त्यांचे जरूर स्वागत करतील.

## १.९ समारोप

या सर्व चर्चेवरून हे लक्षात येतं की चित्रपट विषयक संशोधन बऱ्याच प्रमाणात उपेक्षित असे आहे. या क्षेत्रात संशोधनाला खूप वाव आहे.

मराठी चित्रपटांची निर्मिती त्यातील अडीअडचणींचा शोध हा एक प्रकारचा आत्मशोधच आहे. कारण चित्रपट ही समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचलेली कला आहे. चित्रपट हे एक दुधारी शस्त्रही आहे. ही कला सुव्यवस्थितरीत्या हाताळली तर तारक अन्यथा मारक आहे. हे आज पदोपदी निदर्शनाला येते आहे म्हणूनच या लघुशोधप्रबंधात मराठी चित्रपट निर्मिती प्रक्रियेतील समस्यांचा शोध घेऊन त्यावर उपायही शोधायचे आहेत.

पुढील प्रकरणात या अभ्यासासाठी योजलेल्या संशोधन पद्धतीवर प्रकाश टाकलेला आहे.

***

# संदर्भ सूची


१. साठे वसंत, बखर सिनेमाची, मुद्रक प्रकाशक किरण व्ही. शांताराम-प्रथमावृत्ती डिसेंबर ९२ पृ. क्र. १४३.

२. शेवाळे माधव, नीहारा प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती मार्च १९९३ पृष्ठ क्र. १५२.

३. मॅक्विल डेनिस, मास कम्युनिकेशन थिअरी, सेज प्रकाशन लंडन १९८७. पृष्ठ क्र. १४.

४. कुलकर्णी रविप्रकाश, लोकराज्य, चित्रपटाची ७५ वर्षे- चित्रपट विषयक कोशकारांची वाटचाल. पृष्ठ क्र. ६८.

५. साठे वसंत, बखर सिनेमाची, प्रकाशक- किरण व्ही. शांताराम. प्रथमावृत्ती डिसेंबर ९२ पृष्ठ क्र. ७३.

६. तदेव. पृष्ठ क्र. ७३.

७. कुलकर्णी रविप्रकाश. उपरोक्त. पृष्ठ क्र. ७४.

८. देसाई अभिजीत, लोकप्रभा, दिवाळी अंक-९९. पृष्ठ क्र. ६४.

९. दिलीप राजा-वास्तवातला सिनेमा, सिनेमातलं वास्तव, लोकप्रभा ९ जुलै, १९९९. पृष्ठ क्र. ३२.

१०. समर्थ रामदास. मनाचे श्लोक, श्लोक ११ वा.

११. रेगे ग. म.- दृक् विचार प्रसारणाचे विश्व. पृष्ठ क्र. ६३.

१२. चटर्जी शोभा ए.- मुख्य प्रवाहातील भारतीय चित्रपट, पाश्चात्य प्रभाव आणि सांस्कृतिक अस्मिता, धमकी की प्रेरणा... अभिव्यक्ति, जाने-मार्च २०००. चित्रपट विशेषांक.

१३. साठे वसंत. उपरोक्त. पृष्ठ क्र. ९३

१४. तदेव. पृष्ठ क्र. ८३

१५. तदेव. पृष्ठ क्र. १४३

१६. तदेव. पृष्ठ क्र. १४४

१७. राजवाडे अशोक, अभिव्यक्ति दिवाळी अंक. पृष्ठ क्र. ११६

१८. रेगे ग. म.- उपरोक्त.

१९. राजवाडे अशोक.- उपरोक्त पृष्ठ क्र. १२०.
२०. परळकर अवधूत- अभिरूचि, दिवाळी अंक. पृष्ठ क्र. ९१.
२१. व्हटकर नामदेव- चित्रपट रसग्रहण अर्थात् सिनेमा कसा पहावा १९६१, चंद्रकांत शेट्ये प्रकाशन मंदिर, कोल्हापूर.
२२. शेवाळे माधव- उपरोक्त. पृष्ठ क्र. १२०.
२३. शेवाळे माधव- तदेव. पृष्ठ क्र. १३१.
२४. शेवाळे माधव- तदेव. पृष्ठ क्र. १४०.

□□□